# <u>प्रेसनोट</u>

अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : ०१.०६.२०२३

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचेनाव | अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुददा व कार्यालयाचा पत्ता | श्री.अनिरुध्द वसंतराव राऊत, सहायक निबंधक, सहकारी संस्था (पदूम) अमरावती, प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी कार्यालय, अमरावती, |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | दिनांक ३०/०५/२०२३ चे ११.४८ ते १२.१४ वा.दरम्यान |
| ४ | मागणी केलेली लाच रक्कम | ३५,०००/— रुपये |
| ५ | घटनास्थळ | सहायक निबंधक, सहकारी संस्था (पदूम) अमरावती यांचे दालन, प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी कार्यालय, अमरावती |

**थोडक्यात हकिकत** : सदर प्रकरणातील तक्रारदार हे अध्यक्ष असलेल्या संस्थेच्या विरोधात तक्रार करणारे ९ सभासदांचे सभासदत्व कमी करणेबाबत संस्थेने वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये बहुमताने पारीत ठरावास मान्यता देणेबाबत सहायक निबंधक, सहकारी संस्था, (पदूम), अमरावती यांचेकडे सादर करण्यात आलेल्या ठरावास मान्यता देणेबाबत आदेश काढून प्रत पुरविणेकरीता ४०,००० रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत दिनांक २९.०५.२०२३ रोजी तक्रार प्राप्त झाली.

सदर तक्रारीवरुन दिनांक ३०.०५.२०२३ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार अध्यक्ष असलेल्या संस्थेच्या विरोधात तक्रार करणारे ९ सभासदांचे सभासदत्व कमी करणेबाबत संस्थेने वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये बहुमताने पारीत ठरावास मान्यता देणेबाबत आदेश काढून प्रत पुरविणेकरीता श्री.अनिरुध्द राऊत, सहायक निबंधक, सहकारी संस्था, (पदूम), अमरावती यांनी तडजोडीअंती ३५,००० रुपये लाचेची मागणी करुन ते तक्रारदार यांचेकडून लाच स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दिनांक ३१.०५.२०२३ रोजी आयोजित सापळा कारवाई दरम्यान श्री.अनिरुध्द राऊत, सहायक निबंधक, सहकारी संस्था (पदूम) अमरावती यांनी तक्रारदार अध्यक्ष असलेल्या संस्थेचे ९ सदस्यांचे सभासदत्व कमी केल्याबाबत संस्थेने मंजुर केलेला ठराव अमान्य केलेबाबत आदेश निर्गमीत केल्याने श्री.अनिरुध्द राऊत, सहायक निबंधक यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारली नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द पो.स्टे.फ्रेजरपुरा, अमरावती शहर येथे लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.मारुती जगताप, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.देविदास घेवारे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली आम्ही श्री.एस.एस.भगत, पोलीस उपअधीक्षक, पो.नि.श्री.संतोष इंगळे, पो.नि.श्री.प्रविण पाटील, पो.ना.विनोद कुंजाम, पो.ना.महेंद्र साखरे, पो.कॉ. अभय वाघ, चालक पोउपनि प्रदीप बारबुध्दे, पो.ना.चंद्रकांत जनबंधु यांनी पार पाडली.

नगरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क**: अॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती
ऑफीस फोन नं.०७२१—२५५२३५५,
टोल फ्रि नंबर—१०६४

(एस.एस.भगत)
पोलीस उपअधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती